**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात आज धूलिवंदन आणि होळीचा उत्साह/ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि मान्यवरांकडून जनतेला शुभेच्छा

- प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत आतापर्यंत १ लाख ९२ हजार ९३६ सौर उर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने मिळवला देशभरात दुसरा क्रमांक

- महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी येत्या २ वर्षात शेअर बाजारात उतरणार

**आणि**

- इंडियन प्रीमीयर लीग क्रिकेटमधे दिल्ली कॅपिटल्सचं कर्णधारपद खेळाडू अक्षर पटेल याच्याकडे

**<><><><><>**

राज्यात आज धूलिवंदनाचा सण उत्साहाने साजरा होत आहे. होळी पौर्णिमेनिमित्त काल जागोजाग होळ्या पेटवण्यात आल्या. अनेक ठिकाणी स्थानिक देवतांच्या पालख्या यावेळी मिरवणुकीने नेल्या जातात. कोकणात दशावतारी खेळे आणि नमनाने हा सण साजरा होतो.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज धूलिवंदनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. विकसित महाराष्ट्राच्या वाटचालीत पर्यावरणीय समृद्धीची प्रतिज्ञा करुया असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ठाणे इथं किसननगर परिसरात सहकुटुंब होलिकापूजन केलं. धूलिवंदनानिमित्त रंग खेळण्यातून सकारात्मक प्रेरणा मिळाव्या अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही होळी आणि धूलिवंदनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. नागरिकांनी धुळवड खेळताना पाण्याचा अपव्यय टाळावा तसंच आरोग्याची काळजी घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं आहे.

राज्यात सर्वत्र विविध प्रकारे होळी साजरी होत आहे. **नंदुरबारची** काठी होळी वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने साजरी केली जाते. सविस्तर माहिती ऐकूया आमच्या वार्ताहराकडून...

**व्हॉईस कास्ट - निलेश पवार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. होळीचा सण भारताच्या अमूल्य सांस्कृतिक वारशाचं प्रतीक असून तो एकता, प्रेम आणि सौहार्दाचा संदेश देतो, असं राष्ट्रपतींनी समाज माध्यमावरच्या आपल्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही समाजमाध्यमावरच्या संदेशातून सर्वांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. होळी हा सण म्हणजे चांगल्याचा वाईटावर विजय आणि वसंत ऋतुच्या आगमनाचं प्रतीक आहे, असं धनखड आपल्या संदेशात म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही देशवासियांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. आनंदाने भरलेला हा सण प्रत्येकाच्या आयुष्यात नवीन उत्साह आणि उर्जा आणेल, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. होळी आणि धुळवडीनिमित्त आज शेअर बाजार बंद आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत आतापर्यंत १ लाख ९२ हजार ९३६ सौर उर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने देशभरात दुसरं स्थान मिळवल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाज माध्यमावर दिली आहे. गेल्या वर्षी १३ फेब्रुवारी पासून सुरु झालेल्या या योजनेत देशभरात १० मार्च २०२५पर्यंत एकूण १० लाख ९ हजार सौर उर्जा प्रकल्प बसवण्यात आले. या योजनेत महाराष्ट्र

आपलं योगदान देत राहील तसंच २०२६-२७ पर्यंत १ कोटी कुटुंबांपर्यंत ही योजना पोहोचवण्याचं उद्दिष्ट असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

पालघर जिल्ह्यातल्या आरोग्य सेवांचं बळकटीकरण करून जिल्ह्यातली आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचं, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी म्हटलं आहे. पालघर जिल्ह्यात मनोर इथल्या ट्रॉमा केअर सेंटर तसंच नंडोरे इथल्या जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाची पाहणी केल्यानंतर आबिटकर बोलत होते. पालघर जिल्ह्यातल्या कुपोषणाच्या समस्येचा बारकाईनं अभ्यास करून या समस्येवर मात करण्यासाठी आरोग्य विभाग सकारात्मक प्रयत्न करणार असल्याचंही आबिटकर यांनी सांगितलं.

<><><><>

वेव्हज २०२५ या उपक्रमासाठी देशभरातल्या आशय निर्मात्यांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. या उपक्रमातल्या ॲनिमेशन फिल्ममेकर्स स्पर्धेसाठी ७८ स्पर्धकांना दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळाला आहे. अभिजात कथानक, मनोरंजनाचं मूल्य, तांत्रिक बाजू अशा विविध निकषांच्या आधारावर या स्पर्धकांची निवड करण्यात आली आहे. या स्पर्धकांमध्ये विद्यार्थी, हौशी निर्माते, व्यावसायिक निर्माते तसंच निर्मिती स्टुडिओंचा समावेश आहे. भारतासह लंडन, बाली आणि कॅनडाहूनही अर्ज दाखल झाले आहेत.

<><><><>

येत्या २ वर्षात शेअर बाजारात नोंदणी करण्याचं महावितरण अर्थात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचं नियोजन आहे, अशी माहिती कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा यांनी दिली. वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच विधानसभेत

याचे सूतोवाच केलं होते. येत्या ५ वर्षात नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून मिळणाऱ्या वीजेचे एकूण वीज वितरणातलं प्रमाण १३ टक्क्यांवरुन ५२ टक्क्यांपर्यंत नेण्याचं नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

इस्त्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं स्पाडेएक्स उपग्रहांचं डी-डॉकिंग अर्थात अंतराळातच त्यांना एकमेकापासूंन विलग करण्याची प्रक्रिया पूर्ण केली असल्याचं भू-विज्ञान आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी गुरुवारी  समाजमाध्यमावर जाहीर केलं. यामुळं भविष्यातील चंद्रविषयक संशोधन, मानव अवकाश मोहीम आणि भारताच्या स्वतःच्या अंतराळ स्थानकाच्या उभारणीसाठीचा मार्ग खुला झाला आहे. असं त्यांनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळे इस्त्रोचा उत्साह वृद्धिंगत होत असतो, असं सिंह यांनी इस्त्रोच्या संपूर्ण चमूचं अभिनंदन करताना म्हटलं आहे.

<><><><><>

भारतानं हवामान बदलाच्या संकटाचा सामना करताना नवीकरणीय  ऊर्जा प्रकल्पांचा समावेश  प्राधान्य क्षेत्रात करून त्यासाठी कर्ज पुरवठा करण्यात आघाडी घेतली आहे, असं भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी म्हटलं आहे. हवामान बदलाचा धोका आणि वित्त या विषयावर  नवी दिल्लीत आयोजित संमेलनाला ते काल संबोधित करत होते.

<><><><><>

यूएफबीयू अर्थात यूनायटेड फोरम ऑफ बँक यूनियन्सनं येत्या २४ आणि २५ मार्च रोजी होणाऱ्या नियोजित संपाचा इशारा कायम ठेवला आहे. बँकांमधल्या रिक्त पदांवर भरती, पाच दिवसांचा आठवडा यांसह अन्य प्रमुख मागण्यांसाठी इंडियन बँक्स असोसिएशन बरोबर यूएफबीयूची काल चर्चा झाली. मात्र, या चर्चेतून

काही सकारात्मक निष्पन्न झालं नाही, त्यामुळे संप करण्यावर ठाम असल्याचं यूएफबीयूनं जाहीर केलं आहे.

<><><><><>

इंडियन प्रीमीयर लीग क्रिकेटमधे दिल्ली कॅपिटल्सचं कर्णधारपद अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेल याच्याकडे सोपवण्यात आलं आहे. अक्षर पटेल २०१९ पासून आयपीएलच्या ६ हंगामात दिल्ली कॅपिटल्सकडून खेळला आहे. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचं नेतृत्व रजत पाटीदारकडे, तर कोलकाता नाईट रायडर्सचं अजिंक्य रहाणेकडे आहे. नव्याने आलेल्या लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार ऋषभ पंत असून पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यर आहे. येत्या २४ मार्चपासून २०२५चा हंगाम सुरु होत असून पहिला सामना दिल्ली कॅपिटल्स आणि लखनौ सुपर जायंट्समधे विशाखापट्टणम इथं होईल.

<><><><><>

भंडारा जिल्ह्यातल्या शस्त्रास्त्र निर्मिती कारखान्यात गेल्या २४ जानेवारीला झालेल्या स्फोटाप्रकरणी पोलिसांनी चार अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे. हा स्फोट यंत्र आणि उपकरणांची दुरुस्ती करण्यात झालेल्या निष्काळजीपणामुळे झाल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं. गुन्हा दाखल करण्यात आलेले चारही अधिकारी संरक्षण उत्पादन विभागातील आहेत.

२४ जानेवारीला शस्त्रास्त्र कारखान्यात झालेल्या स्फोटात नऊ जणांचा मृत्यू झाला होता. तर चार जण जखमी झाले होते.

//<><><><><>//